यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)
Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)
सत्यमेव जयते
यशदा ®
ISO 9001 : 2008

क्र.प्रापण/१३२१/लेखन सामग्री/२०२१-२३
दिनांक : १३.०५.२०२२

To,

Shri Bharat Jesha Choudhary
M/S. Mital Stationery & Printers
Bldg No 33, Sukh Sadan Society Shop No 3,
Near Provident Fund Office,
Khernagar Road No. 8, Bandra (East),
Mumbai 400 051

विषय :-सन २०२१-२३ या सालासाठी लेखनसामग्रीचे साहित्य खरेदी करण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याबाबत.

संदर्भ : १. आपल्यासोबत करण्यात आलेला दिनांक २१.०२.२०२२ रोजीचा करारनामा.
२. प्रापण कार्यालयाचे क्र.प्रापण/१३२१/लेखन सामग्री/२०२१-२३ दि. ०३.०३.२०२२ चे पुरवठा आदेश
३. क्र.प्रापण/१३२१/लेखन सामग्री/२०२१-२३ दिनांक २३.०३.२०२२ रोजीचे पत्र.

आपणा सोबत यशदातील सन २०२१-२३ सालासाठी लेखन सामग्री खरेदी करण्याबाबत सदर्भ क्र. १ नुसार करारनामा करण्याल आला होता. त्या अनुशंगाने यशदाच्या नमुन्यानुसार दिनांक ०३.०३.२०२२ रोजीच्या पुरवठा आदेशान्वये पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत पुरविण्याबाबत सदर्भ क्र. २ अन्वये आपणास कळविण्याल आले असून सरच्या मालाचा तात्काळ पुरवठा करण्याबाबत वांरवार दुरध्वनी व्दारे संपर्क साधण्यात येवून सुध्दा पुरवठा आदेशामध्ये नमुद करण्यात आलेल्या वस्तुचा पुरवठा करण्यात आलेले नाही.त्यामुळे आपण यशदास लेखन सामग्रीचा पुरवठा करण्यास इच्छुक नसल्याचे व आपण लेखन सामग्री पुरविण्यासाठी असमर्थ ठरल्याचे दिसुन येते.

०२ आपण विहित वेळेत लेखनसामग्रीचा पुरवठा केलेला नाही व वेळेचाही नाहक अपव्यय केलेला आहे. तसेच नव्याने निविदा मागवुन वस्तु खेरदी करण्यामध्ये वेळ व यशदाचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार आपणाकडून प्राप्त झालेली सुरक्षा ठेव रक्कम रु. ९०००/- (रु. नऊ हजार मात्र) जप्त का करण्यात येऊ नये व भविष्यात पुढील १० वर्ष यशदास कोणतीही निविदा भरण्यास प्रतिबंध का घालण्यात येऊ नये व आपल्या नावाचा समावेश काळया यादीत का करण्यात येऊ नये अशी विचारण करण्यात येऊन याबाबत खुलासा दिनांक १४.०४.२०२२ रोजीपर्यंत सादर करण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरून आपण आज रोजीपर्यंत कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

(कृ.मा.प)


राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे ४११ ००७. भारत (इपीएबीएक्स) : (०२०) २५६०८००० कार्यालयीन वेळेनंतर : २५६०८२७१, फॅक्स : २५६०८१००
Raj Bhavan Complex, Baner Road, Pune 411 007. India (EPABX) : (020) 25608000 After Office Hrs. : 25608271, Fax : 25608100
Email : yashada@vsnl.com contact@yashada.org | Website : www.yashada.org

०३ आर्थीक वर्ष २०२१-२३ या कालावधीसाठी यशदातील लेखन सामग्री पुरवठा ठेक्यापोटी आपणाकडुन यशदाकडे सुरक्षा ठेवीपोटी जमा करण्यात आलेली रक्कम रू. ९०००/- (नऊ हजार मात्र) जप्त करण्यात येत आहे. तसेच आपल्या कंपनीचा यशदातील काळया यादीत करण्यात समावेश येऊन पुढील १० वर्षे म्हणजे २०३२ अखेरपर्यंत आपणास यशदाच्या कोणत्याही प्रकारच्या निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे.

(मा. महासंचालक सो यांच्या मान्यतेने)

निबंधक
(यशदा, पुणे)

प्रत – १. मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान केंद्र
यांनी यशदाच्या वेबसाईटवरील ठेकेदाराच्या ब्लॅक लिस्टच्या फोल्डर मध्ये मे मित्तल स्टेशनरी ॲन्ड प्रिंटर्स, मुंबई यांचा काळया यादीमध्ये समावेश केल्याबाबतच्या तपशीलाचा समावेश करावा

२. लेखाधिकारी, यशदा यांचेकडुन मे मित्तल स्टेशनरी ॲन्ड प्रिंटर्स, मुंबई या ठेकेदारांची बयाणा रक्कम जप्त करण्याची कार्यवाही करावी.